महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे 1.
ईमेल– sakalyanpuneest@gmail.com

जा.क्र. सकआ/आस्था/सेसेप/घोषणा/२०२४-२५/पुणे / ५०१ दि.१२.०३.२०२५.

# घोषणापत्र

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील वर्ग-३ संवर्गातील विविध पदभरती करीता दि.१०.१०.२०२४ रोजी सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीतील मुद्दा क्र.२१ मध्ये उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक या पदांकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ, दि.०४ मे, २०२२ नुसार निवडीबाबत खालील प्रमाणे नमुद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल असे नमूद आहे.

त्यानुषंगाने ज्या पदांसाठी व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असेल, अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ३० गुण ठेवून एकूण १२० गुणांची (एकूण १०० प्रश्न) परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि, जे उमेदवार परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल. परीक्षा व व्यावसायिक चाचणी यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल.

सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.३० गुणांचे ऋणात्मक गुण असेल. (गुण कपात करण्यात येईल)

12-03-25

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with OKEN Scanner